# लेखी तक्रार

**प्रति,**
**मा. पोलीस निरीक्षक साहेब,**
पो.स्टे. एम.आय.डी.सी. अकोला,
ता.जि. अकोला.

**तक्रारदार :—** **विवेक प्रभाकर बिजवे,**
रा. गौरक्षण रोड, दत्त कॉलनी,
रामधन अपार्टमेंट, अकोला, ता.जि. अकोला.
मो.क्र. ९०२११०५७५०

**गैरअर्जदार :—** **प्रमोद राहुल गायकवाड,**
अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,
अकोला, ता.जि. अकोला.
मो.क्र ९८६०२५८९३२

**विषय :— गैरअर्जदार यांचेकडुन बेकायदेशीर रक्कमेची मागणी करून व स्विकारून तसेच संघटनेतील सदस्यांना वारंवार असभ्य वागणुक देवुन, अश्लील शिवीगाळ करून धमकाविल्या बाबत लेखी तक्रार.**

**महोदय,**

१. मी उपरोक्त ठिकाणचा कायमचा रहिवासी असुन अकोला जिल्हा खाण व क्रशर उद्योजक संघ, अकोला याचा मी कार्यकारी अध्यक्ष असुन श्री. बीजवे स्टोन क्रशर याचा सहभागीदार आहे. मी गेल्या ३० वर्षापासुन सदर व्यवसायात कार्यरत आहे.

२. असे की, खणीकर्म विभागाचे पदसिध्द अध्यक्ष हे त्या जिल्हयाचे मा. जिल्हाधिकारी साहेब हे असतात. सदर विषयानुषंगाने गै.अ. यांनी स्वत:ला सदर विभागाचा कार्यभार सोपविण्यात आले असल्याचे सांगितले.

त्याअनुषंगाने मी दि. १९.०३.२०२६ म्हणजेच गुडी पाडव्याच्या दिवशी मला गै.अ. च्या ९८६०२५८९३२ या मो.क्र. वरून माझ्या मो.क्र. ९०२११०५७५० फोन आला व गै.अ. नी मला एस.एस. जीन कम्पाऊंड च्या समोर असलेल्या त्यांच्या शासकीय निवास स्थानावर भेटण्यास बोलाविले. मी त्यांना भेटण्यास पोहाचलो असता त्यांनी असे म्हटले. तुमच्या संघाच्या म्हणजे (खाणधारकांकडुन) प्रत्येक सदस्या कडुन मला किती रक्कम वसुल करून देता असे म्हटले. मी गै.अ. ला नम्रपणे म्हटले की, साहेब, आमच्या प्रत्येक सदस्याने शासकीय देणे पुर्णरित्या भरलेले आहे व कोणताच भरणा आमच्याकडे थकबाकी नाही. यावर गै.अ. याने चिडुन मला म्हटले की, ते सर्व जाऊ द्या हो माझं काय ते सांगा? त्यावर मी गै.अ. यांना म्हटले की, साहेब आम्ही सगळे सदस्य सध्या मार्च एंडींगच्या गडबडी मध्ये आहोत. मार्च झाल्यावर मी सगळया सदस्यांशी बोलतो. यावर गै.अ. यांनी चिडुन म्हटले की, पाहा तुम्हाला काय करायचे आहे ते नाहीतर मला कारवाई करावी लागेल.

३. तद्नंतर दि. २१.०३.२०२६ रोजी गै.अ. यांनी अकोट येथील नायब तहसिलदार श्री. सोनोने साहेब व त्यांचेसोबत आलेले काही अधिकारी यांनी गैरकायदेशीररित्या आमच्या संघाचे सदस्य रामदेव स्टोन मेटल चे संचालक श्री. विलास केशर चव्हाण, श्री. मनोज पांडुरंग राजगुरे, रा. अकोला यांच्या बोरगांव मंजु येथील राजगुरे स्टोन क्रशर तसेच श्री. रमेश काशीराम वानखडे यांच्या गजानन स्टोन क्रशर तसेच गोवर्धन क्रशरचे संचालक बिपीनभाई चांगेला, तसेच शिवशक्ती स्टोन क्रशर चे संचालक श्री. रमणीकभाई कनसागरा तसेच जे.डी. इन्फ्राचे संचालक श्री. दिलीप अग्रवाल तसेच शिवदया स्टोन क्रशर चे संचालक यशपाल शर्मा व इतर काही सदस्यांकडे भेट देवुन सदर खाणीबाबतची माहिती घेवुन खाणीचे मोजमाप

गैरकायदेशीररित्या घेण्यास सुरूवात केली असता जेव्हा त्यांना कारवाईबाबत विचारले असता त्यांनी गै.अ. चे नाव सांगुन त्यांच्याकडुन कारवाई करण्याचे आदेश प्राप्त झाले व तुम्ही साहेबांच्या मागणीबाबत दुर्लक्ष केले व पुर्तता केली नाही म्हणुन सदरची कारवाई करण्यात येत असल्याचे सांगितले.

४. असे की, दि. २२.०३.२०२६ रोजी गैरअर्जदार श्री. प्रमोद गायकवाड यांनी स्वत: बोरगांव मंजु येथील राजगुरे स्टोन क्रशर, शिवशक्ती स्टोन क्रशर आणि संजय स्टोन क्रशर येथे भेट देवुन रॉयल्टी भरल्या असल्याबाबतची विचारपुस करू लागले व तद्नंतर त्यांनी तुमचे सर्वांचे सर्व काम बेकायदेशीर आहे व मला कारवाई करावी लागेल नाहीतर मला प्रत्येकी रू. १५,०००/— गोळा करून देणे करा नाहीतर आपणा सर्वांवर कारवाई होणार. सदर घटनेवरून आमच्या संघातील सदस्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले व त्यामुळे घाबरून आमच्या संघातील १० लोकांनी रू. १५,०००/— प्रत्येकी गैरअर्जदार यांना देणे केले. तद्नंतर गैरअर्जदार यांनी उर्वरीत सदस्यांच्या पैशाच्या वसुलीबद्दल आमच्या संघाच्या सदस्यांना पैसे गोळा करून पोहोचते करण्याचे निर्देश दिले.

५. तद्नंतर दि. २५.०३.२०२६ रोजी सायंकाळी ६:१० मिनीटांनी माझ्या मो.क्र. वर गैरअर्जदार यांचा फोन आला व सदरचा कॉल मी उचलु शकलो नाही म्हणुन मी त्यांना ६:२८ मिनीटांनी परत कॉल बॅक लावला असता गैरअर्जदार यांनी उर्वरीत सदस्यांच्या देणे असलेल्या प्रत्येकी रू. १५,०००/— रक्कमेबाबत विचारल्यावर मी बाहेरगावी असल्याचे त्यांना सांगितले व आल्यावर भेटतो असे म्हटले. सदर संभाषणाचे कॉल रेकॉर्डिंग माझेकडे उपलब्ध आहे. त्यानंतर दि. २७.०३.२०२६ रोजी दुपारी ४:३३ मिनीटांनी गैरअर्जदार यांचा माझ्या मो.क्र. वर मिस्‌ड कॉल आला असता मी परत दुपारी लगेच ४:३४ मिनीटांनी कॉल बॅक केला असता गैरअर्जदार

यांनी परत उर्वरीत रक्कम अद्याप प्राप्त न झाल्याबाबत चौकशी केली व लवकरात लवकर रक्कम देण्याचे आदेशीत केले.

६. तद्नंतर दि. २९.०३.२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजताच्या दरम्यान आमचे संघाचे सन्माननीय सदस्य श्री. शुभम सुभाष तायडे यांना त्यांचा मो.क्र. ७५०७३१०४४६ वर पातूर तहसिल कार्यालय येथुन गैरअर्जदाराच्या वतीने मोबाईलवर कॉल आला व गै.अ. यांनी भेटायला तेथे बोलाविले असल्याचे सांगितल्या गेले व आमचे सदस्य श्री. शुभम तायडे हे गैरअर्जदार यांना भेटायला पातूर तहसिल कार्यालय येथे भेटण्यास दुपारी अंदाजे १२:३० वाजताच्या सुमारास गेले असता गैरअर्जदार यांनी दालनात बोलाविले व असभ्य वागणुक देवुन तुम्ही सर्व हरामखोर आहात व तुमची रू. १५,०००/— देण्याइतकीही लायकी नाही मी असेपर्यंत आता तुम्ही काम कसे करता? हे मी पाहुन घेतो व मी आता काय करतो ते पाहा! असे म्हणत मला अपमानित करून दालनातुन बाहेर हाकलुन दिले.

७. असे की, दि. ०१.०४.२०२६ रोजी गैरअर्जदार यांनी दुपारी १:५२ मिनीटांनी मला मिस्ड कॉल दिला असता मी लगेच १:५३ मिनीटांनी गैरअर्जदारास कॉल बॅक केले असता गैरअर्जदार यांनी उर्वरीत रक्कम अद्याप न मिळाल्याबाबत खुप नाराजी व्यक्त केली व तुम्ही सर्व ४२ लोकांना पाहुन घेतो व पुढील कुठल्याच कामात सहकार्य मिळण्याची अपेक्षा ठेवु नका व मी तुम्हाला पाहुन घेतो; अशी धमकी दिली. सदरची कॉल रेकॉर्डींग सुध्दा तपासकामी माझेकडे उपलब्ध आहे.

८. असे की, गैरअर्जदार यांनी बेकायदेशीररित्या स्वत:जवळ असलेल्या अधिकारांचा गैरवापर करून आमच्या संघातील सन्माननीय सदस्यांना वेठीस धरून त्यांच्याकडुन कोणतेही कायदेशीर कारण नसतांना तसेच त्यांच्या कामांमध्ये जाणीवपुर्वक त्रुटी काढुन त्यांच्याकडुन बेकायदेशीररित्या मोठी

रक्कम उकळुन उर्वरीत रक्कमेसाठी काम न करू देण्याची धमकी देवुन आमच्या काही सदस्यांना वारंवार अपमानित करून पैशांची मागणी केली. गैरअर्जदाराच्या अशा बेकायदेशीर वागण्याने आमच्या संघात भितीचे वातावरण निर्माण होवुन गैरअर्जदाराच्या भितीपोटी अनेक सदस्यांनी कशर बंद केले असुन त्यांच्यावर उदरनिर्वाहाचे संकट निर्माण झाले आहे.

करीता गैरअर्जदार यांचेवर बी.एन.एस. चे कलम व विविध कायद्यातील तरतुदींनुसार कठोर कायदेशीर कारवाई करून व गुन्हा नोंदवुन कार्यवाही करावी ही विनंती.

अकोला
दि. ०३/०४/२०२६

..........................
तक्रारदार

**प्रतिलीपी,**

१. मा. पोलीस अधिक्षक साहेब, पोलीस अधिक्षक कार्यालय, अकोला.
२. मा. उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब, अकोला.